N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली  **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0351  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**23/05/2026 09:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिंनाक पासून):** 22/05/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 22/05/2026
**Time From (वेळेपासून):** 13:42 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 23/05/2026  **Time (वेळ):** 00:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 23/05/2026 00:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्या, हिंगोली,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुलभा प्रल्हाद राउत
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग हिंगो,हिंगोली,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग हिंगो,हिंगोली,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** पोलीस अधिकारी
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922061123

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश मधुकर राउत | | | 1. महाकाली नगर ,हिंगोली,हिंगोली, हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | अविनाश नंदकिशोर गोरे | | | 1. यशोदा नगर पार्ट 2, ,कारंजा, कारंजा,कारंजा,वाशिम,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

(१-बी)



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकार तर्फे फियाद

ला.प्र.वि.कार्यालय हिंगोली.
दिनाक 22/05/2026

मी, सुलभा प्रल्हाद राउत वय 43 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली मो.नं. 9922061123 सरकार तर्फे फियादी होऊन फियाद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, फेब्रुवारी 2026 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.

मी दिंनाक 22.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना कार्यालयात हजर असलेले तक्रारदार यांनी तक्रार दिली की, मी शेख माजीद शेख चाँद वय 43 वर्ष व्यवसाय शेती व मंजुरी रा. रिसाला बाजार ता. जि. हिंगोली येथील रहिवाशी आहे. मी मौजे बांसबा येथे शेत गट क्रंमाक 658 मध्ये 36 आर जमीन विकत घेतलेली आहे. मी सदर शेत गटाची जमीनीची मोजणी करणे करीता उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, हिंगोली येथे अर्ज दिला होता. त्यावरुन दि.13.03.2026 रोजी भूकरमापक श्री गोरे, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, हिंगोली यांनी माझे शेत गटाची जमीनीची मोजणी केली होती. यावेळी त्यांच्यासोबत श्री राउत, भूकरमापक हे सुध्दा हजर होते. त्यानंतर दि. 10.04.2026 रोजी भूकरमापक श्री गोरे, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, हिंगोली यांना माझे शेत जमीनीच्या खुणा दाखविल्या होत्या. माझे मौजे बांसबा शेत शिवार गट क्रं. 658 ची मोजणी शिटची प्रत मला अदयाप देणे बाकी आहे. मी माझे प्रंलबित कामाचे अनुंशगाने उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, हिंगोली या कार्यालयाची हद्दीच्या खूणा दाखविणेची नोटीस ची छायाकिंत प्रत माहितीस्तव यासोबत देत आहे.

दि.19.05.2026 रोजी भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथील भूकरमापक श्री राउत यांनी त्यांचा मोबाईल क्रंमाक 8275331070 वरुन माझ्या मोबाईल क्रंमाक 8669135509 वर फोन करुन सांगीतले की, तुमची शेत गटाची मोजणी झालेली आहेत त्या मोजणी शिटची ची प्रत तुम्हाला मी देता, त्या बदल्यात मला 15,000/- रुपये दयावे लागतील. मी सध्या बाहेरगावी आहे. मी आल्यावर तुम्हाला भेटतो, त्यावेळी तुम्ही 15,000/- रुपये घेवुन या असे म्हणुन भूकरमापक श्री राउत, यांनी माझे शेत गटाची मोजणी शिटची प्रत देण्याकरीता मला 15,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. त्यांना देण्यासाठी 15,000/- मी माझे बचतीमधुन सोबत आणले आहेत.

मी आज दि.22.05.2026 रोजी, उप अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे जावुन श्री राउत, भूकरमापक यांची समक्ष भेट घेणार आहे. माझेत व लोकसेवक श्री राउत, भूकरमापक यांचेत कोणताही आर्थीक व्यवहार नाही. तथा आमचेमध्ये कोणताही सदर कामाचे व्यतिरीक्त कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. तसेच त्यांच्या विरुध्द माझी कोणतीही प्रकारची दुष्मनी नाही. सदरची लाच रक्कम 15,000/- रुपये मला त्यांना देण्याची इच्छा नाही. त्यामुळे त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी ही विंनती आहे. अशा आशयाची तक्रार दिली होती. सदरचे तक्रारी वरुन कारवाईचे अनुषगाने तालुका कृषी अधिकारी, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे शासकिय कर्मचारी पंच 1) शिवाजी नागोराव मोरे, वय 35 वर्ष पद- सहायक कृषी अधिकारी, 2) शरद रंगनाथ राठोड, वय 36 वर्ष, पद- सहायक कृषी अधिकारी दोन्ही नेमणुक तालुका कृषी अधिकारी कार्यालय हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.22.05.2026 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तक्रारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचासमक्ष तोंडी कथन केली. तक्रारदार यांनी दिलेली तक्रार पंचानी वाचुन पाहिली.

तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तक्रार व टंकलिखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांनी सांगीतले कि, आज दि.22.05.2026 रोजी, उप अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे जावुन श्री राउत, भूकरमापक यांची समक्ष भेट घेणार आहे व तेथे त्यांची राउत, भुकरमापक, यांचे सोबत भेट होणार आहे असे सांगीतले. त्यावरून आमच्या सुचनेवरून पोशि श्री जाधव यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना लाप्रवि कार्यालयातील व्हा◌ॅईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणा-या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. त्यानंतर अंदाजे 13.42 वा. सुमारास व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार श्री शेख माजीद यांचे अंगातील शर्टचे आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकवुन देवुन, तक्रारदार शेख माजीद व पंच क्र. 1 श्री मोरे यांना लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक यांची भेट घेण्याकरीता त्यांचे उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे तक्रारदार यांच्याकडील विना नंबरची टीव्हीएस कंपनीची स्कुटीने व पंच क्रं.1 मोरे हे त्यांच्याकडील मोटार सायकलने लाप्रवि कार्यालय, हिंगोली येथुन रवाना केले.
त्यानंतर तक्रारदार शेख माजीद व पंच क्र. 1 मोरे हे पडताळणी कारवाई करून लाप्रवि कार्यालय, हिंगोली या ठिकाणी परत आले, तेव्हा पोशि श्री जाधव यांनी तक्रारदार शेख माजीद यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर अंदाजे 14.13 वा. सुमारास बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर तक्रारदार श्री शेख माजीद व पंच क्र.1 मोरे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री मोरे यांनी सांगितले की, तक्रारदार व लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक व अविनाश गोरे, भुकरमापक यांची उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथील लिपीक वर्गीय रुममध्ये भेट झाली. तक्रारदार हे त्यांच्या कामासंबधाने बोलणे झाले त्या भेटी दरम्यान लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक हे तक्रारदार शेख माजीद यांना म्हणाले की, कुछ नही तुम्हारी शिट लेके जाणा ना... त्यावर तक्रारदार म्हणाले की, हो तो शेट अब पैसे बोलना पडगेना तुम्हारेको...माँकी बहुत होरे ना हो... पंधरा हजार त्यावर लोकसेवक राउत हे लोकसेवक गोरे यांना म्हणाले की, पंधरा म्हणले होते यायले... ते म्हणतात पंधरा बहोत होरे... त्यावर तक्रारदार म्हणाले की, पंधरा मधुन चार दिले पहिले हो... त्यावर राउत म्हणाले की, दिले न नाही कधी म्हणल... त्यावर तक्रारदार यांनी तडजोड करण्याची विंनती केली असता तडजोडी मध्ये लोकसेवक गोरे हे तक्रारदारास म्हणाले की, दहा दया आता बरोबर होवुन जाते असे म्हणाले.
अषा प्रकारे लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक यांनी तक्रारदार शेख माजीद यांच्याकडे पंचासमक्ष 15,000/-रू. रुपये लाचेची मागणी केली. तडजोडी मध्ये लोकसेवक गोरे यांनी पंचासमक्ष 10,000/-रू. लाच रक्कम देण्यासाठी तक्रारदार शेख माजीद यांना प्रोत्साहन देवुन लाच रक्कम आजच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक, व अविनाष गोरे, भुकरमापक या दोघांची यांची उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथील कार्यालयात भेट होईल असे सांगितल्याने लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक व अविनाश गोरे, भुकरमापक या दोघा विरुध्द उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथील कार्यालयातील सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर लाप्रवि कार्यालय, हिंगोली येथे सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. पोह मंडलिक यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अॅन्थ्रा◌ॅसिन पावडर व अल्ट्राव्हा◌ॅयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक किंवा अविनाश गोरे, भुकरमापक यांनी तक्रारदार शेख माजीद यांचेकडुन लाचेची रक्कम स्विंकारल्यानतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणुन डोक्याला गुंडाळलेला मोठा रुमाल सोडुन हातात धरणेबाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यानंतर पोह मंडलिक यांनी लाच रक्कमेला अॅन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिल्या.
त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 15.21 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 मोरे यांच्यासोबत लोकसेवक उमेश राउत, भुकरमापक व अविनाष गोरे, भुकरमापक यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार शेख माजीद यांच्याकडील विना नंबरची टीव्हीएस कंपनीची स्कुटीने व पंच क्रं.1 मोरे हे त्यांच्याकडील मोटार सायकलने लाप्रवि कार्यालय, हिंगोली येथुन उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने सापळा पथकातील पोलीस उपअधीक्षक श्री विकास घनवट, पोह श्री फुपाटे, पोशि श्री. पुंडगे, पोशि श्री. जाधव असे वेगेवगळया मोटार सायकलने व आम्ही व पंच क्रं.2 श्री राठोड, पोशि वाघ, चापोह अकबर असे शासकिय वाहन क्र.एम.एच.38एडी 4337 ने जिल्हा परीषद रोडने उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगाली कडे रवाना झालो. तेथे गेल्यावर काही अंतरावर तक्रारदार त्यांच्याकडील स्कुटी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, कार्यालयाच्या आवारात उभी केली त्यांच्या पाठोपाठ पंच क्रमांक 1 श्री मोरे हयांनी सुध्दा त्यांच्याकडील मोटार सायकल उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारात उभी केली. त्यावेळी आम्ही व सापळा पथकातील

अंमलदार असे उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली च्या समोरील रोडवर सोबतची वाहाने उभी करुन सापळा पथकाने तिथे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.

त्यावेळी तक्रारदार शेख माजीद हयांनी उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारातुन लोकसेवक राउत यांना फोन केला असता थोडयावेळाने लोकसेवक राउत व गोरे हे उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारात आले तेंव्हा अंदाजे 15.47 वाजता तक्रारदार शेख माजीद यांच्याकडुन लोकसेवक अविनाष गोरे, भुकरमापक, यांनी पंचासमक्ष स्वतः 10,000/- रु. लाच रक्कम स्विकारली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाच स्विकारल्या बाबत त्यांचे डोक्याला गुंडाळलेला मोठा रुमाल सोडुन हातात धरून सापळा पथकास लाच स्विकारले बाबत इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक, उमेश राउत, भुकरमापक व अविनाश गोरे, भुकरमापक यांना उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातील लिपीक वर्गीय रुममध्ये ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोशि जाधव यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक उमेष राउत, भुकरमापक अविनाष गोरे, भुकरमापक यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी अनुक्रमे त्यांची नावे 1) उमेष मधुकर राउत, वय 38 वर्ष, पद-भुकरमापक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली. ह.मु. महाकाली नगर हिंगोली, मु.पो. पांगरखेड ता.मेहकर जि.बुलढाणा, 2) अविनाश नंदकिशोर गोरे, वय 44 वर्ष, व्यवसाय नौकरी पद-भुकरमापक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली. रा. यशोदा नगर पार्ट 2, कारंजा ता.कारंजा जि.वाशिम, असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक अविनाश गोरे, भुरकरमापक यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्रॉसिन पावडर युक्त 10,000/-रू.(ज्यात 500/-रू. दराच्या 20 नोटा) लाच रक्कम त्यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातील लाच रक्कम काढुन ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार श्री. शेख माजीद शेख चाँद, वय 44 वर्ष, व्यवसाय- शेती व मंजुरी रा. रिसाला नाका, हिंगोली यांनी दिंनाक 22.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, दिंनाक 22.05.2026 रोजी करण्यात आलेला पडताळणी पचंनामा, सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक, 1) उमेश मधुकर राउत, वय 38 वर्श, पद-भुकरमापक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली. ह.मु. महाकाली नगर हिंगोली, मु.पो. पांगरखेड ता.मेहकर जि.बुलढाणा, हयांनी तक्रारदार शेख माजीद यांना त्यांचे शेत गटाचे मोजणी शिटची प्रत देण्याकरीता 15,000/- रुपयाची लाचेची मागणी करुन त्यापैकी 4,000/- रुपये लाच यापुर्वी स्विकारल्याचे मान्य केले. तक्रारदार यांनी तडजोडीची विंनती केली असता लोकसेवक 2) अविनाष नंदकिशोर गोरे, वय 44 वर्श, व्यवसाय नौकरी पद-भुकरमापक, उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय हिंगोली. रा. यशोदा नगर पार्ट 2, कारंजा ता.कारंजा जि.वाशिम यांनी तक्रारदारास 10,000/- दया असे लोकसेवक राउत यांच्या समक्ष म्हणाले असता, त्यास राउत यांनी संमती दर्षविली. आज दिंनाक 22.05.2026 रोजी 15.47 वा. सुमारास सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार शेख माजीद यांच्याकडुन उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे कार्यालयाच्या आवारात 10,000/- रु लाच रक्कम पंचा समक्ष लोकसेवक गोरे यांनी लोकसेवक राउत व स्वतःसाठी स्वतः स्विकारली आहे.

आरोपी लोकसेवक उमेश मधुकर राउत, पद-भुकरमापक, व लोकसेवक अविनाश नंदकिशोर गोरे, पद-भुकरमापक हयांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी करुन, लोकसेवक अविनाश नंदकिशोर गोरे, पद-भुकरमापक यांनी स्वतःसाठी व लोकसेवक राउत यांचेकरीता लाच रक्कम स्विकारली आहे म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.): DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, *Police Station***
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANDEEP KHANDER.
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.हिंगोली (श.)